Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email : secretary. stateboard@gmail.com

Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Secretary(P) : 25651750

महत्वाचे /तातडीचे

क्र.रा.म./परीक्षा-३/४२६६
पुणे - ४११००४
दि.-१९/०८/२०१९

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

**विषयः-** "सरल" प्रणाली अंतर्गत विविध पोर्टल वर माहिती भरणे व ती अंतिम करणे बाबत.

**संदर्भः-** शासन निर्णय क्रमांक ई.गव्ह.१५१७/प्र.क्र.१९/संगणक दि.१४/०८/२०१७

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की,

१) इयत्ता दहावी/बारावी फेब्रुवारी–मार्च २०२० परीक्षेची आवेदनपत्रे गतवर्षीप्रमाणे डेटाबेसवरुन घ्यावयाची असल्यामुळे आपल्या कार्यकक्षेतील सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना त्यांच्या विद्यार्थ्यांची माहिती SARAL database मध्ये अचूक उपलब्ध आहे का? याची खातरजमा करण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांचे नाव व जन्मतारीख अचूक असल्याबाबत विद्यार्थ्यांकडून खातरजमा करुन दिनांक ३१ ऑगस्ट २०१९ पर्यंत सर्व डेटा अपडेट करण्याबाबत सूचित करावे.

२) ऑनलाईन ॲप्लीकेशन करण्याकरिता विद्यार्थ्यांचा फोटो व सही यांच्या Images असणे आवश्यक आहे. त्या संकलित करण्याबाबत शाळांना/कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करण्यात यावे. फेब्रुवारी–मार्च २०२० मध्ये आयोजित करावयाच्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षांची आवेदनपत्रे SARAL database वरुनच भरण्यात यावी असे कळविण्यात यावे.

३) तसेच इ.१०वी/१२वी परीक्षांची आवेदनपत्रे भरणे चालू असतांना शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून विविध अडचणीबाबत सतत फोन येत असतात त्याकरिता त्यांना माहिती देण्याकरीता आपल्या विभागीय मंडळामधील परीक्षा शाखा/लेखा शाखा/गणकयंत्र विभाग यांची मिळून एक मोबाईल हेल्प लाईन सुरु करावी व ती सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना उपलब्ध करुन देण्यात यावी. तेव्हा वरीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्यमंडळ कार्यालयास सादर करावा.

सचिव,
राज्यमंडळ, पुणे- ०४

प्रत माहितीस्तव
व्यवस्थापक,
गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे

---

क्र.पुविमं/शाखा अ/उ मा/ ४८७०
पुणे-४११ ००५.
दि.२७/०८/२०१९

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य ,
सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालये, (पुणे, अहमदनगर, सोलापूर).

उपरोक्त राज्यमंडळाच्या परिपत्रकाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी. सदर माहिती सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या सूचना फलकावर लावून विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

२७/८/१९

विभागीय सचिव ,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११ ००५.